गुरुवार, २३ सप्टेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ६६
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

...तर सिडकोची कामे बंद पाडू; भूमिपुत्रांचा इशारा/२
बलात्काराची फिर्याद देणारी महिलाच निघाली आरोपी/५
पनवेलचा कुस्तीपटू शंकर जाधवला सुवर्णपदक/६

## कोरोनामुळे मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांना मिळणार ५० हजार रुपये



**नवी दिल्ली :** कोरोनामुळे मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना ५० हजार रुपयांची सानुग्रह रक्कम मिळेल, अशी माहिती केंद्र सरकारने बुधवारी (दि. २२) सर्वोच्च न्यायालयाला दिली. आधी झालेल्या मृत्यूंसाठीच नव्हे तर भविष्यातील लोकांसाठीही भरपाई दिली जाईल, असे न्यायालयाला सांगण्यात आले. ही रक्कम राज्य सरकार म्हणजेच राज्य आपत्ती निवारण निधीद्वारे दिली जाईल. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन केल्यानंतर एनडीएमएने भरपाईसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. देशात आतापर्यंत ३.९८ लाख लोकांनी कोरोनामुळे आपले प्राण गमावले आहेत. कोरोनाबळी ठरलेल्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्याची मागणी करणाऱ्या विविध याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयासमोर सरकारने भरपाईचे आश्वासन दिले होते.

# राष्ट्रवादीसोबत आघाडी नकोच!

## ■ रायगडातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची उद्योगमंत्री सुभाष देसाईंसमोर स्पष्ट भूमिका

**माणगाव : प्रतिनिधी**

आम्हाला कुठल्याही पक्षासोबत आघाडी करायला सांगा, पण राष्ट्रवादी काँग्रेससोबत यापुढे जमणार नाही, अशी स्पष्ट भूमिका रायगड जिल्ह्यातील शिवसेनेचे आमदार आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपल्या पक्षाचे ज्येष्ठ नेते व राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्यासमोर बुधवारी (दि. २२) मांडली. जिल्हा परिषदेसह आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावरच लढवू, असेही स्थानिक नेतेगणांनी या वेळी सांगितले.

माजी केंद्रीय मंत्री आणि शिवसेना नेते खासदार अनंत गीते यांनी श्रीवर्धन येथे राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीसंदर्भात केलेल्या वक्तव्याचे राजकीय वर्तुळात जोरदार पडसाद उमटले आहेत. या पार्श्वभूमीवर उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी बुधवारी माणगाव येथे तातडीची बैठक बोलावली होती. या बैठकीस शिवसेनेचे आजी-माजी आमदार तसेच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



(छाया : सलीम शेख)

या बैठकीत देसाई यांनी आगामी स्थानिक निवडणुकांबाबत पदाधिकाऱ्यांची मते जाणून घेतली. राज्यात महाविकास आघाडी सत्तेवर आहे, मात्र जिल्ह्यात राष्ट्रवादीसोबत जाण्यास स्थानिक पदाधिकाऱ्यांनी या वेळी विरोध दर्शवला. वेळ पडलीच आणि युती आघाडी करायची झाल्यास अन्य कुठल्याही पक्षासोबत करायला सांगा, पण राष्ट्रवादीशी नकोच, अशी थेट भूमिका त्यांनी मांडली.

रायगडात शिवसेनेचे तीन आमदार असतानाही पालकमंत्रिपद मात्र एक आमदार असलेल्या राष्ट्रवादीला मिळाले. याचे शल्य आमदारांसह शिवसैनिकांनाही आहे. त्यातच पालकमंत्री आणि खासदार कुरघोडीचे राजकारण करतात, आमदारांना विश्वासात घेत नाही, अशा तक्रारी शिवसेनेकडून सातत्याने केल्या जात आहेत. गीते यांच्या रूपाने या साऱ्याला वाचा फुटली असल्याची भावना शिवसैनिकांमध्ये आहे. त्यातूनच राष्ट्रवादीशी आता सोबत नको, अशी भूमिका शिवसेनावाल्यांनी घेतली आहे.

## राज्यसभा पोटनिवडणूक : भाजपचे संजय उपाध्याय यांचा अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभेच्या पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार मुंबई भाजपचे सरचिटणीस संजय उपाध्याय यांनी बुधवारी (दि. २२) मुंबईत प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

या वेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, भाजप मुंबई अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, प्रदेश कोषाध्यक्ष आमदार मिहीर कोटेचा, माजी मंत्री व आमदार गणेश नाईक, आमदार विद्या ठाकूर, आमदार योगेश सागर, आमदार गिरीश व्यास, आमदार संजय केळकर, आमदार कुमार आयलानी, आमदार राहुल नार्वेकर, आमदार मंगेश चव्हाण, आमदार सुनील राणे, आमदार तमिळ सेल्वन, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार भारती लव्हेकर आदी उपस्थित होते.



काँग्रेसचे खासदार राजीव सातव यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी ४ ऑक्टोबर रोजी ही पोटनिवडणूक होणार आहे. काँग्रेसने रजनी पाटील यांना उमेदवारी दिली असून त्यांनीही आपला अर्ज भरला आहे.

दरम्यान, भाजपच्या १२ निलंबित आमदारांना राज्यसभेच्या निवडणुकीत मतदान करता येणार आहे. निवडणूक आयोगाने या संदर्भात पत्रक काढून आपला निर्णय जाहीर केला आहे.

## ही तर अपरिपक्वता -फडणवीस



**मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना पाठवलेल्या पत्रावर प्रतिक्रिया**

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या पत्राला पत्राने उत्तर दिल्यानंतर विरोधकांनी उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. दरम्यान, या प्रकरणावर माजी मुख्यमंत्री व विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी ही अपरिपक्वता असल्याचे म्हटले आहे. राज्यपालांना असे पत्र पाठवताना खातरजमा केली पाहिजे, असे फडणवीस म्हणाले.

फडणवीसांनी सांगितले की, राज्यपालांनी मुख्यमंत्र्याना पाठवलेल्या पत्रात शक्ती कायदा लवकर व्हावा अशा प्रकारची मागणी केली आहे. यासाठी दोन दिवस विशेष अधिवेशन बोलावा, असे राज्यपाल म्हणाले होते, मात्र राज्यपालांनी हे सूचवले होते. त्यांनी कुठल्याही प्रकारचा आदेश दिला नव्हता तसेच सरकार कोणतेही असो किंवा कुठलेही राज्यपाल असो, त्यावर अशाच प्रकारचे पत्र पाठवण्यात येत असते. हे मी २५ वर्षांपासून पाहत आहे, पण **(पान ४ वर..)**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त शहरातील कर्मवीरांच्या पुतळ्याला 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.** (छाया : लक्ष्मण ठाकूर) **अधिक छायाचित्रे पान २ वर..**

## आयपीएलमध्ये पुन्हा कोरोनाची एण्ट्री!

**दुबई : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये पुन्हा एकदा कोरोनाने शिरकाव केला आहे. सनरायजर्स हैदराबाद संघाचा गोलंदाज टी नटराजनला कोरोनाची लागण झाली असून सध्या नटराजनसह त्याच्या संपर्कात आलेल्या सहा जणांना आयसोलेट (विलग) करण्यात आले आहे. दरम्यान, हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यातील बुधवारी (दि. २२) होणारा सामना नियोजितपणे खेळविण्यात आला.



**हैदराबादच्या नटराजनला लागण; संपर्कातील सहा जण विलगीकरणात**

मिळालेल्या माहितीनुसार, टी नटराजन आरटी-पीसीआर चाचणीत पॉझिटिव्ह आढळला. त्याला कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. त्यानंतर उर्वरित संघाचीही कोरोना चाचणी करण्यात आली. यात संपर्कात आलेल्या लोकांचा समावेश आहे. या सर्वांचा अहवाल निगेटिव्ह आला आहे. सध्या नटराजन आणि त्याच्या संपर्कात आलेला खेळाडू विजय शंकर तसेच इतर कर्मचाऱ्यांना आयसोलेट करण्यात आले आहे.

## निवडक

### 'कोविशिल्ड'ला ब्रिटनची अखेर मंजुरी; प्रमाणपत्रावर मात्र आक्षेप

**लंडन :** भारताच्या इशाऱ्यानंतर इंग्लंडने आपल्या प्रवास धोरणात बदल केले असून कोविशिल्ड लसीला मान्यता दिली आहे, मात्र अद्यापही दोन लस घेतलेल्यांना क्वारंटाइन व्हावे लागणार आहे. भारतात दिली जाणारी कोविशिल्ड लस नाही, तर तिचे प्रमाणपत्र ही आमची मूळ समस्या असल्याचे इंग्लंडने म्हटले आहे. लसीच्या प्रमाणपत्राला मान्यता देण्यासाठी भारतासोबत चर्चा सुरू असल्याचीही माहिती देण्यात आली आहे.

### नांदेडचे विवेक चौधरी होणार भारतीय वायूदलाचे प्रमुख

**मुंबई :** महाराष्ट्रातील नांदेडचे सुपुत्र एअर मार्शल विवेक राम चौधरी हे भारतीय वायूदलाचे नवीन प्रमुख होणार आहेत.



वायूदलाचे विद्यमान प्रमुख आर. के. एस. भदौरीया हे ३० सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागी मराठवाड्यातील नांदेडचे भूमिपुत्र विवेक चौधरी यांची नियुक्ती करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.

## भाजप ओबीसी मोर्चा उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीसपदी दशरथ म्हात्रे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीसपदी दशरथ म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवारी (दि. २२) पनवेल येथे झालेल्या भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणी बैठकीत म्हात्रे यांची नियुक्ती जाहीर केली.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस आमदार महेश बालदी, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, विनोद साबळे, वसंत भोईर, दीपक बेहेरे, ज्येष्ठ नेते सुनील घरत, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष मनोज भुजबळ, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह जिल्हा व तालुका मंडलातील पदाधिकारी उपस्थित होते.

यापूर्वी दशरथ म्हात्रे यांनी भाजपचे पनवेल तालुका मंडल सरचिटणीस म्हणून यशस्वी जबाबदारी बजावलीय. युवा संघटनात्मक कार्याची उत्तम जाण व दांडगा जनसंपर्क त्यांच्याकडे आहे. समाजातील अनेक प्रश्न मार्गी लावण्यात त्यांचा पाठपुरावा राहिला आहे. त्यामुळे त्यांची जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

## अतिवृष्टीमुळे कार्ला लेणी बंद

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील प्रसिद्ध एकवीरा मातेचे स्थान असलेली कार्ला लेणी पर्यटकांसाठी पुन्हा एकदा बंद करण्यात आली आहे. या वेळी मात्र अतिवृष्टीमुळे हा निर्णय घेण्यात आलाय. मंगळवारी धो-धो पाऊस बरसला. त्यात दरड येथे कोसळली.

मावळचे तहसीलदार मधुसूदन बर्गे यांनी बुधवारी (दि. २२) कार्ला येथे जाऊन पाहणी केली. त्यानुसार भारतीय पुरातत्त्व विभाग आणि जिल्हा प्रशासनाने मिळून पर्यटकांसाठी कार्ला लेणी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेमुळे येथील पर्यटनावर चार महिन्यांसाठी बंदी होती. ती १७ सप्टेंबरला उठवण्यात आली, पण अतिवृष्टीमुळे या ठिकाणी पर्यटकांच्या जीवाला धोका उद्भवू शकतो. म्हणून पुन्हा एकदा येथे पर्यटकांना तूर्त बंदी घालण्यात आली आहे.

## मुंबई वगळता इतर महापालिकांमध्ये आता तीन सदस्यीय प्रभाग पद्धत


**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई वगळता राज्यातील इतर सर्व महापालिकांच्या निवडणुकीत आता तीन सदस्यीय प्रभाग पद्धत असणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. २२) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याबाबत महाविकास आघाडी सरकारमधील तिन्ही पक्षांच्या वेगवेगळ्या भूमिका होत्या, असे सूत्रांकडून समजते.

महापालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकीत दोन सदस्य प्रभाग असावा अशी राष्ट्रवादीची भूमिका होती, तर शिवसेनेची चार सदस्य असावा अशी मागणी होती. या बैठकीत अजित पवार यांनी दोन सदस्यीय प्रभागांची भूमिका मांडली, तर एकनाथ शिंदे यांनी चार सदस्यीय भूमिका मांडली, पण अखेर तीन सदस्य प्रभाग पद्धतीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्याचप्रमाणे नगरपालिका आणि नगर परिषदांमध्ये दोन सदस्यीय प्रभाग रचना, तर नगरपंचायतींमध्ये एक सदस्यीय प्रभाग रचना असणार आहे.

महापालिका निवडणुकांसाठी बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीचा निर्णय मंत्रिमंडळाने बुधवारी घेतला, मात्र प्रभागात किती सदस्य असतील हे अद्याप स्पष्ट केलेले नाही. प्रभाग पद्धतीवर दोन्ही काँग्रेसमध्ये एकमत होत नसल्याने प्रभागात किती सदस्य असावेत हे ठरलेले नाही, असे कळते.

दरम्यान, मुंबईत एक, तर पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूरसह इतर साऱ्या महापालिकांसाठी तीन सदस्यांचा प्रभाग असेल. त्यामुळे महापालिकांच्या निवडणुका मुदतीत म्हणजेच फेब्रुवारीत होणार असल्याचे चित्र आहे.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
गुरुवार, दि. २३ सप्टेंबर २०२१ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
२. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.

कोवॅक्सिन

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

१. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
२. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल


# ट्रकचालकांच्या डुलकीवर सेन्सरचा उपाय

## ■ केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचा अभिनव प्रयोग



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशभरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर होणारे रस्ते अपघात हा चिंतेचा विषय आहे. या अपघातांमध्ये जीवितहानी होत असल्याने त्यावर तोडगा काढणे आवश्यक झाले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी प्रशासनाला नवे आदेश दिले असून त्यानुसार ट्रकचालकांच्या चुकांमुळे किंवा त्यांना ट्रक चालवताना डुलकी लागल्यामुळे होणाऱ्या अपघातांना आवर घालण्यासाठी लागलीच वाजणारे सेन्सर्स बसवले जाणार आहेत.

रस्ते अपघातांची संख्या कमी करण्यासाठी गडकरींनीच राष्ट्रीय रस्ते सुरक्षा गटाची स्थापना केली आहे. दर दोन महिन्यांनी या गटाची बैठक होते आणि त्यात संभाव्य योजनांवर चर्चा केली जाते. मंगळवारी झालेल्या या गटाच्या बैठकीत गडकरींनी सेन्सर्स बसविण्याचे आदेश दिले. त्याचप्रमाणे ट्रकचालकांचे ड्रायव्हिंगचे तास निश्चित करण्यात येणार आहेत. या संदर्भात सर्व राज्य सरकारे आणि जिल्हाधिकाऱ्यांनादेखील निर्देश दिले जातील, असे त्यांनी सांगितले.


दरम्यान, रस्ते अपघातात होणाऱ्या मृत्यूंची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी व्हायला हवी हे स्पष्ट करतानाच गडकरींनी या बैठकीमध्ये रस्ते सुरक्षा गटाच्या सदस्यांना या संदर्भात लवकरात लवकर धोरण तयार करण्याचे सूचित केले आहे.

## मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा निकाल जाहीर

### २६ सप्टेंबरला पनवेलमध्ये अंतिम फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा निकाल जाहीर करण्यात आला असून अंतिम फेरी रविवारी (दि. २६) पनवेलमध्ये होणार आहे.



अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष तथा महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष आहे. मराठी भाषेत आयोजिलेली ही स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये होत असून प्राथमिक फेरी ऑनलाईन पद्धतीने झाली. यामध्ये १०० जणांनी सहभाग घेतला. प्राथमिक फेरीचे परीक्षक म्हणून दिग्दर्शक, अभिनेते दीपक पवार आणि नकलाकार, अभिनेते श्रीनिवास लखपती यांनी काम पाहिले. प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या स्पर्धकांची अंतिम फेरी ऑफलाईन स्वरूपात पनवेलमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात होईल. **(पान ४ वर..)**

# ...तर सिडकोची कामे बंद पाडू!

## पनवेलमधील कोल्ही कोपरच्या भूमिपुत्रांचा इशारा

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पिकती सुपीक जमीन व सुस्थितीत असलेली घरेदारे सिडकोला तुटपुंज्या दरात बहाल केल्यानंतर सिडकोने ग्रामस्थांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे कोल्ही कोपर ग्रामस्थ आक्रमक झाले असून या विभागातील सिडकोची सर्व विकासकामे बंद करू, असा इशारा भूमिपुत्रांनी पत्रकार बुधवारी (दि. २२) परिषदेत दिला.



साडेबावीस टक्के जमीन देण्याच्या नावाखाली प्रत्यक्ष साडेबारा टक्केच जमीन देऊन दहा टक्के मोबदला देण्याचे ठरविण्यात आले होते, मात्र साडेबारा टक्के जमीन मिळण्याऐवजी पावणेआठ टक्केच जमीन भूमिपुत्रांच्या वाट्याला आली असून सिडकोने भूमिपुत्रांची घोर फसवणूक केली आहे. या संदर्भात बुधवारी कोल्ही-कोपर येथील लक्ष्मी नारायण मंदिरात भूमिपुत्रांनी आपल्या झालेल्या फसवणुकीचा पाढाच वाचला. गाव कमिटीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सिडकोच्या गलथान कारभाराचा तीव्र निषेध व्यक्त केला गेला. या संदर्भात सिडकोविरोधात न्यायालयीन लढाईचाही निर्धार या वेळी करण्यात आला. येथील प्रकल्पबाधित गाव कमिटीने सांगितले की, आमची घरे उठविल्यानंतर आम्हाला १९ महिन्यांचे घरभाडे देण्याचे सिडकोने मान्य केले होते, मात्र प्रत्यक्षात १२ महिन्यांचेच घरभाडे देण्यात आले असून साडेचार वर्षे उलटूनही अनेक प्रकल्पग्रस्त भाड्याच्या घरातच राहत आहेत. या संदर्भात सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन व पत्रव्यवहार करूनसुद्धा सिडको भूमिपुत्रांना डावलण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

देवस्थानच्या भूखंडाच्या नावाखाली आमच्या गावातील प्रकल्पग्रस्तांच्या भूखंडाचा बराच हिस्सा सिडकोकडून लाटला गेला आहे. याबाबत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात अर्ज केला असता, या कार्यालयातून श्री लक्ष्मी नारायण देवस्थान ट्रस्ट मु. कोल्ही, ता. पनवेल, जि. रायगड या नावाने नोंद नसल्याचे लेखी पत्र आम्हाला देण्यात आलेले आहे. तरीही सिडकोच्या कागदोपत्री या ट्रस्टची नोंद करण्यात आली आहे. आमचे गाव यापूर्वी पारगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत होते, मात्र आता गावाची अनेक ठिकाणी विभागणी झाल्यामुळे आमच्या गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावी, अशीही मागणी या वेळी करण्यात आली.

गावातील प्रमिला प्रभाकर नाईक व बेबी काशिनाथ भोईर यांची घरे सिडकोने तोडली असून त्यांना नुकसानभरपाई अगर मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे ही दोन्ही कुटुंब उद्ध्वस्त झाली असून सध्या भाड्याच्या घरात वास्तव्य करीत आहेत, अशी माहिती उपस्थित ग्रामस्थांनी दिली.

पत्रकार परिषदेला पंच कमिटीचे मोहन नाईक, धनराज भोईर, सरपंच अहिल्या बाळाराम नाईक, मनखुश नाईक, जनार्दन करावकर, बाळराम नाईक, महेंद्र नाईक, राहुल नाईक, तान्हाजी भोईर, हृषिकेश भोईर, गंगाराम नाईक, कृष्णा नाईक, प्रल्हाद नाईक, बबन घरत, राम पाटील, कृष्णा भोईर, अमृत भोईर, मधुकर भोईर, प्रभाकर नाईक, हरिभाऊ नाईक, काशिनाथ भोईर, रोहिदास पाटील, शंकर डोंगरे आदी उपस्थित होते.

### आश्वासने हवेत विरली

सिडकोकडे गावासाठी मैदान उपलब्ध करून देण्यासाठी मागणी केली असता, त्या मागणीलासुद्धा वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या असून मैदानासाठी राखीव असलेला भूखंड एका शिक्षण संस्थेला देण्यात आलेला आहे तसेच सिडकोने अनेक नागरी सोयी सुविधा देण्यासंदर्भात आम्हाला आश्वासने दिली होती, परंतु त्याचीसुद्धा आजमितीस पूर्तता झाली नाही. आमचे गाव नवी मुंबई विमानतळासाठी विस्थापित झाल्याने वडघर, करंजाडे, पुष्पकनगर नोड येथे जागा देण्यात आली आहे. त्यामुळे आमच्या गावचे नावच नकाशावरून पुसले गेले आहे. त्यामुळे आमच्या गावाची ओळख कायम राहण्यासाठी या विभागाला गावाची मूळ नावे देण्यात यावीत, अशी आग्रही मागणीही पत्रकार परिषदेत करण्यात आली.



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची जयंती संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये साजरी झाली. या वेळी 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कर्मवीर अण्णांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल सीबीएसई बोर्डाच्या प्राचार्य अर्चना चव्हाण, पीआरओ बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते.**

## कर्मवीरांना अभिवादन





**पनवेल : सामान्य जनतेसाठी 'कमवा व शिका' ही योजना सुरू करून शिक्षण क्षेत्राला नवी दिशा देणारे कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची १३४वी जयंती पनवेलमध्ये साजरी करण्यात आली. त्यानिमित्त शहरातील कर्मवीरांच्या पुतळ्याला 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत व अन्य मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी 'रयत'चे रायगड विभागीय चेअरमन बाळाराम पाटील, जनरल बॉडी सदस्य जे. एम. म्हात्रे, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, 'रयत'चे विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, लाइफ मेंबर नरेश मढवी, प्रमोद कोळी, जिनगोंडा बोरगावे, रवींद्र भोईर, पीआरओ बाळासाहेब कारंडे आदी उपस्थित होते. महात्मा फुले महाविद्यालयातील एनसीसीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने कर्मवीरांना मानवंदना देण्यात आली.**

## सोसायट्यांमध्ये लसीकरण मोहीम राबविण्याची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोना विषाणूपासून सरक्षण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाला कोरोना प्रतिबंधात्मक लसीचे कवच असणे आवश्यक आहे. त्या पार्श्वभूमीवर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने कळंबोली-रोडपाली परिसरातील काही सोसायट्यांमध्ये लसीकरण मोहीम राबवण्याची मागणी भाजप युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष अमर ठाकूर यांनी केली. या संदर्भात त्यांनी आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन दिले.

या संदर्भात महापालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण होणाच्या दृष्टीने आयुक्तांनी सकारात्मकता दाखवली आहे. तसेच सोसायट्यांचा समोरून प्रतिसाद मिळत असल्याने त्यांनी कौतुक केले. लवकरच पालिका क्षेत्रामध्ये गृहसंकुलामधून लसीकरणाला सुरुवात होणार आहे, असेही आयुक्तांनी सांगितले. निवेदन देतेवेळी नगरसेवक अनिल भगत, नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक बबन मुकादम उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, खालील भुखंडाचे मालक **मे. दुबे कन्स्ट्रक्शन ॲन्ड इन्फ्रा तर्फे भागिदार (१) श्री. दयाशंकर रामचंद्र दुबे व (२) श्री. सचेंद्र कुमार दयाशंकर दुबे, पत्ता-ए-८६, मातृछाया, श्रीरंग सोसायटी, ठाणे (पश्चिम), ४००६०१.** यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधील संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधील स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरीता **भुखंड क्र. ५६, सेक्टर-आर-५, क्षेत्र १६०.०० चौ.मी., नोड - वडघर (पुष्पक नगर), ता. पनवेल, जि. रायगड** या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदरचा भुखंड माझे अशिल श्री. सुरज रामचंद्र कोळी, पत्ता - ११४, एम.सी.सी.एच. सोसायटी, साई पुजा फ्लॅट नं. १४, आर. डी. सी. सी. बँक जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. यांच्या नावे ''खरेदी विक्रीच्या करारनाम्याद्वारे / त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| वडघर (पुष्पकनगर) | आर - ५ | ५६ | १६०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२/०९/२०२१

**सही/-**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**
कार्यालय :- तळ मजला, प्लॉट नं. बी-४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई.- ४००७०६. मो.९३२४५६९८०६.


### दुखवटा

**कल्पना सुर्वे**

**पेण :** नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तुकाराम सुर्वे यांच्या पत्नी माजी नगरसेविका कल्पना सुर्वे (वय ६७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.



**सुनिता राणे**

**उरण :** तालुक्यातील केगाव ग्रामपंचायत हद्दीत राहणारे संजय राणे यांच्या मातोश्री सुनिता दत्तात्रेय राणे (वय ८६) यांचे बुधवारी (दि.१५) निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. कै. सुनिता यांचा दशक्रिया विधी शुक्रवारी (दि. २४) श्री क्षेत्र माणकेश्वर येथे, तर उत्तरकार्य रविवारी (दि. २६) रिद्धी-सिद्धी मंदिरासमोर विनायक येथे होणार आहे.




### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील प्रमाणे वर्णन केलेली शेती मिळकत त्या मिळकतसमोर लिहीलेल्या मालक / कब्जेदार कडून आमचे अशिल विकत घेणार आहेत. सदर मालक/कब्जेदार आमचे अशिलांचे सोबत रजिस्टर्ड खरेदीखत करणार आहेत. सदर शेती मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र-हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १) श्रीमती. बारकूबाई शनिवार मढवी<br>२) श्रीमती. सिताबाई गोविंद पाटील<br>३) श्री. रविंद्र गोविंद पाटील<br>४) श्री. मेघनाथ गोविंद पाटील<br>५) श्री. बळीराम गोविंद पाटील | १३५ | १ | ०-२०-०० | १.९४ |
| ६) श्रीमती. अलका नरेश म्हात्रे<br>७) श्रीमती. चंद्रभागा कचरू पाटील<br>८) श्रीमती. दुषिला गोविंद पाटील<br>९) श्रीमती बेबीबाई लहू पाटील<br>१०) श्रीमती देवयानी संतोष पाटील<br>११) श्री. दर्शन लहू पाटील<br>१२) श्री. प्रमोद लहू पाटील<br>१३) श्री. हरिदास विष्णु मढवी<br>१४) श्रीमती. कमला सोमनाथ पाटील<br>१५) श्रीमती. जयवंती जगदिश कालेकर | १३४ | २ | ०-११-८० | १.२३ |

वर नमुद केलेल्या शेती मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तिच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी खत, साठेकरार, मिळकत विकसीत करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास अथवा नसल्यास सदर शेती मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मिळकतीचा कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व खरेदीखत रजिस्टर्ड करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण - पनवेल
दिनांक - २२/०९/२०२१

**सही/-**
**श्री. प्रफुल्ल विठोबा म्हात्रे**
ॲडव्होकेट हायकोर्ट व नोटरी (भारत सरकार)

११, केशव वसंत, जुने तहसील कार्यालयासमोर, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड.



महाराष्ट्र शासन राजपत्र भाग ४-ब गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ९-१५,२०२१/भाद्र १८-२४, शके १९४३

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर २०२१.

### सूचना

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**

क्र.आयडीसी. २०२१/प्र.क्र.१८३/उद्योग १४.-ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा. महाराष्ट्र तीन) यांच्या कलम १, पोट-कलम (३) अन्वये करण्यात आलेली व महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र, भाग चार-ब, दिनांक १५ एप्रिल २०२१, पृष्ठ क्र. १ ते २ वर प्रसिद्ध करण्यात आलेली महाराष्ट्र शासनाचे उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे क्रं.आयडीसी. २०२१/(प्र.क्र.१८३) उद्योग-१४, दिनांक १५ एप्रिल २०२१, अन्वये उपरोक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेत नमूद केलेले ''मौजे जामगाव, तालुका रोहा, जिल्हा रायगड'' येथील क्षेत्रास दिनांक १५ एप्रिल २०२१ या तारखेपासून लागू करणेत आलेल्या आहेत व उक्त क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या कलम २ खंड (ग) अन्वये, ''औद्योगिक क्षेत्र'', म्हणून जाहीर केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अनुसूचीमध्ये जाहीर केलेल्या जमिनी त्याभागात समाविष्ट आहे. (यापुढे याचा उल्लेख ''उक्त जमीन'' असा करण्यात येईल.);

आणि, ज्याअर्थी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरिता उक्त जमिनी औद्योगिक क्षेत्र म्हणून विकासासाठी या जागेची आवश्यकता असल्याचे राज्य शासनाचे मत आहे ;

आणि, ज्याअर्थी उक्त जमिनीच्या जमीन मालकांचे व त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे म्हणणे अधिनियमांच्या कलम ३२ चे पोट-कलम (२) प्रमाणे एकूण घेतलेले आहे व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने या कलमाच्या ३२ चे पोट-कलम (१) च्या अनुषंगाने उक्त जमीन संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) चा वापर करून सदर जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादित केल्या असल्याबद्दलची ही नोटीस महाराष्ट्र शासन या कलमा अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रसिद्ध करीत आहे.

**अनुसूची**
**मौजे जामगाव, तालुका रोहा, जिल्हा रायगड.**

| अ.क्र. (१) | सर्व्हे नंबर/गट नंबर (२) | हिस्सा नंबर (३) | क्षेत्र हे.आर (४) |
|---|---|---|---|
| १ | ३८ | अ | १.४३९ |
| २ | ३८ | ब | १.१७० |
| ३ | ३९ | ० | ०.६०० |
| ४ | ४० | ० | १.३४० |
| ५ | ४१ | ० | ०.६७० |
| ६ | ६० | १ | ०.५६० |
| ७ | ६० | २ | ५.३३० |
| ८ | ६१ | ० | ०.३०० |
| ९ | ६२ | १ | २.२४० |
| १० | ६२ | २ | १.२१० |
| ११ | ६३ | ० | ०.२८५ |
| १२ | ५२६ | ० | १.१३८ |
| १३ | ५२७ | ० | १.०२३ |
| १४ | ५२८ | ० | १.२०० |
| १५ | ६६० | ० | ०.३७० |
| १६ | ६६१ | अ | १.१८५ |
| १७ | | **एकूण** | **२०.०६** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**दिनांक : २२/९/२०२१**
**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१०६/१२९९/२०२१**

**संजय देगांवकर,**
शासनाचे सह सचिव

# कोरोना लसीकरणाची व्याप्ती वाढतेय!

## पोदी, तक्का, काळुंद्रे, भिंगारीत भाजप नगरसेवकांच्या प्रयत्नाने केंद्र सुरू

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत पोदी, तक्का, काळुंद्रे व भिंगारी येथे आठवड्यातून एकदा कोरोना लसीकरणाची सोय करण्यात आली आहे. नवीन पनवेलमधील पोदी येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेत मंगळवार (दि. २१) पासून त्याची सुरुवात करण्यात आली. नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक तेजस कांडपिळे व अॅड. मनोज भुजबळ यांच्या प्रयत्नाने ही केंद्र सुरू करण्यात आल्याने तेथील नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.



पनवेल महापालिकच्या प्रभाग २० आणि १७मधील वाढती लोकसंख्या पाहता लस घेण्यासाठी यूपीएचसी-३मध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत होती. टोकन घेण्यासाठी पहाटेपासून रांग लागत असल्याने नोकरी करणाऱ्यांना व ज्यांचे पोट हातावर आहे अशांना लस मिळणे अवघड झाले होते. त्यामुळे नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक मनोज भुजबळ व तेजस कांडपिळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आयुक्तांना पत्र देऊन पोदी, तक्का, काळुंद्रे व भिंगारी येथे लसीकरण केंद्र सुरू करण्याची मागणी केली होती.

सभागृह नेते परेश ठाकूर यांनीही त्याबाबत आयुक्तांकडे पाठपुरावा केल्याने मंगळवारपासून पोदीवरील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले शाळेत लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले. या वेळी १६५ जणांना पहिला डोस व ५७ जणांना दूसरा डोस देण्यात आला. या वेळी प्रभाग समिती 'ड'च्या सभापती सुशीला घरत, नगरसेविका चारुशीला घरत, नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, अजय बहिरा तसेच किशोर मोरे, शैलेश पाटील उपस्थित होते. दरम्यान, भाजप पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे आणि काळुंद्रे येथील शंकर म्हात्रे यांनी पोदी येथील लसीकरण केंद्राला भेट दिली. दर सोमवारी काळूंद्रे, मंगळवारी पोदी, शुक्रवारी भिंगारी आणि शनिवारी तक्का येथे लसीकरण करण्यात येणार आहे.

**माझ्यासारख्या महिलांना घरातील कामावर जाणाऱ्यांचे डबे बनवायचे सोडून कोरोना लस घेण्यासाठी कूपन घ्यायला पहाटे रांगेत उभे राहणे शक्य होत नव्हते. नवीन पनवेलमधील पोदीवरील शाळेत कोरोनाची लस देण्याची सोय करण्यात आल्याने मला कोरोनाची लस घेणे शक्य झाले आणि वेळही वाचला. त्याबद्दल नगरसेविका चारुशीला घरत यांचे आभार मानावे तेवढे थोडेच.**



**–वैशाली पाटील, गृहिणी**

# वाशीच्या कॉलेजमध्ये कर्मवीर अण्णांना अभिवादन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३४वी जयंत्ती बुधवारी (दि. २२) साजरी झाली. जयंतीनिमित्त 'रयत'च्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी कोरोना काळात संस्थेने केलेल्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. या कार्यक्रमाला रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित होते.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांची उपस्थिती

'रयत'चे अध्यक्ष शरद पवार यांनी सामाजिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ज्यांनी अफाट काम केलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'रयत'ने सन २०२०-२१ पासून पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राष्ट्रीय पुरस्कार व लक्ष्मीबाई भाऊराव पाटील राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केले. या पुरस्काराचे यंदाचे मानकरी समाजसेवक कैलासवासी गणपतराव देशमुख व झाहिरबाई सोमा कोकले हे ठरले. या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी रुपये दोन लाख ५० हजार व मानपत्र असे आहे. हे पुरस्कार ९ मे २०२२ रोजी सातारा येथे कर्मवीरांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात प्रदान करण्यात येतील.

या कार्यक्रमाचे झूम या प्रसारमाध्यमाद्वारे प्रक्षेपित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्रतिभा गायकवाड, नगरसेवक दशरथ भगत, माजी उपमहापौर अविनाश लाड, अॅड. पी. सी. पाटील, प्राचार्या शुभदा नायक, सर्व विभागांचे उपप्राचार्य तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## निवडक

### वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेत आसुडगाव, खांदा कॉलनी येथील राजाराम शंकर आवटी (वय ५१) यांचे निधन झाले आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजाराम शंकर आवटी हे जेवणानंतर शतपावली करण्याकरता राहत्या बिल्डिंगच्या बाहेर गेले. या वेळी अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला आहे.

### शॉक लागून एकाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील कानपोली येथे पिठाच्या गिरणीला शॉक लागून सोमनाथ अण्णा पाटील (वय ३६, रा. कानपोली) यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सोमनाथ पाटील यांचा पिठाची गिरणीचा व्यवसाय आहे. सोमनाथ यांना या गिरणीला शॉक लागून त्यांचा सकाळी ८ वाजता मृत्यू झाला. असल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांना एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले डॉकटरानी त्यांना मृत घोषित केले.

### तळोजा परिसरातून महिला बेपत्ता

**पनवेल :** तळोजा परिसरातील मच्छी कंपनीतून आपल्या राहत्या घरी पेण जाण्यासाठी निघालेली एक महिला अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार गजानन पाटील यांनी तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रभावती गजानन पाटील असे बेपत्ता महिलेचे नाव असून वय ४५ वर्षे रंग गोरा, उंची पाच फूट, बांधा मध्यम, गळ्यात मंगळसूत्र, अंगात रंगीबेरंगी साडी, आकाशी ब्लाउज, खांद्यावर काळी हॅन्डबॅग असे या महिलेचे नाव व वर्णन आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे ०२२२७४१२३३३ पोलीस नाईक अर्जुन पवार यांच्याशी संपर्क साधा असे आवाहन करण्यात आले आहे.

### स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाची बैठक

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाची बैठक पनवेलमध्ये आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आगामी काळात येऊ घातलेल्या पनवेल महापालिका निवडणुकीत स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्ष निवडणूक लढविणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिली. साळुंखे म्हणाले की, आंबेडकरी चळवळीतील सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आगामी महानगरपालिका निवडणूक लढविली जाईल. त्याचबरोबर समविचारी पक्षाशी युती करण्याचा विकल्प सुद्धा खुला ठेवलेला आहे. या संदर्भात लवकरच प्रभागनिहाय बैठका घेऊन पदाधिकारी जाहीर करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पनवेल परिसरात कार्यकर्त्यांचा मेळावा, महिला आघाडी मेळावा व इतर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

# पनवेल प्रभाग १८मध्ये साफसफाई

## नगरसेवक विक्रांत पाटील यांचा पाठपुरावा



**पनवेल : वार्ताहर**

स्वच्छ भारत सर्वेक्षणांमध्ये पनवेल शहर हे कचराकुंडी मुक्त शहर असेल यासाठी सर्वजण प्रयत्न करत आहेत. नगरसेवक विक्रांत पाटील हे आपला प्रभाग सुंदर व स्वच्छ असावा यासाठी महापालिका आरोग्य विभागाकडे प्रयत्न करीत आहेत. त्याअनुषंगाने नुकतेच प्रभाग क्रमांक १८मधील हॉटस्पॉट ठरत असलेली ठिकाणे आशियाना कॉर्नर, विरुपाक्ष हॉल, नवीन कोर्ट आणि शांताबाई गाडगे मार्ग येथे स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली.

या सर्व ठिकाणाची सफाई करून घेण्यात आली व नागरिकांना या जागी कचरा टाकू नये, असे आवाहन नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या वतीने करण्यात आले. जमा झालेला ओला आणि सुका कचरा वेगवेगळा करून घंटागाडीमध्ये टाकावा, अशी विनंतीही येथील नागरिकांना करण्यात आली. नागरिकांनी सुद्धा या उपक्रमाला त्यांचा सहभाग राहील असे सांगितले. आपल्या पनवेल शहराला स्वच्छ पनवेल, सुंदर पनवेल व कचराकुंडी मुक्त शहर करण्याकरीता नागरिकांनी सहकार्य करावे व ओला, सुका कचरा आणि जैविक कचरा हे तिन्ही वेगळे करून ठेवायची सवय सर्व पनवेलकरांनी अंगीकृत करून घ्यावी जेणेकरून स्वच्छ भारत सर्वेक्षणामध्ये आपले शहर मानांकित होईल, असे आवाहनही विक्रांत पाटील यांनी केले.

## अभीष्टचिंतन



**उरण : भाजप व्यापारी आघाडी संयोजक हितेश शाह यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका अध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, शहर अध्यक्ष व नगरसेवक कौशिक शाह, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष शेखर पाटील, व्यापारी आघाडी सहसंयोजक मनोहर साहतिया, सेक्रेटरी हस्तीमल मेहता, मननशेठ पटेल, अजित भिंडे, भाजप नेते मदन कोळी, सुरज ठवळे आदी उपस्थित होते.**

# तळोजा जेलमधून आरोपीचे पलायन

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा जेलमध्ये कैदेत असलेल्या आरोपी संजय यादव (वय २८, रा. भांडूप) याने जेलमधील गार्डची नजर चुकवून पलायन केले. त्याचा पोलिसांनी शोध घेतला, मात्र तो हाती लागलेला नाही. त्यामुळे त्याच्यासोबत जेलमधून पळून जाताना पकडल्या गेलेल्या आरोपीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी संजय यादव याचा २०१८मध्ये भांडूपमध्ये झालेल्या एका १७ वर्षीय मुलाच्या हत्या प्रकरणात भांडूप पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर संजयची तळोजा कारागृहात रवानगी करण्यात आली होती. आरोपी संजय यादव आणि राहुल जैस्वाल दोघेही औषध घेण्याच्या बहाण्याने आपल्या बॅरिकेटमधून बाहेर पडले होते. त्यानंतर वॉच टॉवरवर गार्ड नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे संजयने वॉच टॉवरला लागून असलेल्या तळोजा जेलच्या २५ फुट उंच भिंतीवर चढून तेथून त्याने बाहेर उडी मारून पलायन केले. राहुल उडी टाकण्यास घाबरल्याने तो थांबला. हा प्रकार गार्डच्या निदर्शनास आल्यानंतर त्याने तत्काळ राहुलला पकडले. पळून गेलेल्या संजयचा शोध घेतला, मात्र तो पोलिसांना सापडला नाही.

# खारघर बेलपाड्यात शनिवारी रक्तदान शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

साखर चौथ गौरा गणपती उत्सवानिमित्ताने पनवेल महापालिकेचे प्रभाग समिती 'अ'चे माजी सभापती तथा विद्यमान नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे व खारघर बेलपाडा येथील शिव प्रतिष्ठान सामाजिक संस्थेच्या वतीने तसेच नेरूळच्या डी. वाय. पाटील हॉस्पिटलच्या सहकार्याने खारघरमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

खारघर सेक्टर ३ बेलपाडा गाव, विठ्ठल रखुमाई मंदिरासमोर होणारे हे शिबिर शनिवारी (दि. २५) सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत होईल. अधिक माहितीसाठी शत्रुघ्न काकडे (९८१९९८५९२३), विजय भोसले (९३२४३७९००५), श्रीकांत भोईर (९३२३१२३१११), आकाश काकडे (९९२०६४३८२३), रुपेश काकडे (८८७९३०३०१५) यांच्याशी संपर्क साधावा.

या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी सहभागी होण्याचे आवाहन शिबिराच्या आयोजकांनी केले आहे.

# पनवेलच्या काळण समाज सभागृहात रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या सर्व रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा भासत आहे. हा रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रुधिरसेतु संकल्पित काळण समाज मध्यवर्ती व राजे शिवराय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रोटरी क्लब खारघर, टाटा मेमोरियल सेंटर (एसीटीआरइसी), सह्याद्री ब्लड डोनर्स ग्रुप, रेनोवेअर हेल्थकेअर सोल्युशन्स यांच्या सहकार्याने होणारे हे शिबिर पनवेलमधील जुना ठाणा नाका येथील काळण समाजमंदिर सभागृहात सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत होणार आहे.

नाव नोंदणीसाठी https://forms.gle/YMQC77Gk-CP4oWoK9 या लिंकवर भेट द्यावी व अधिक माहितीसाठी उन्मेष लोहार (७७३८१५२१५६), अमोल साखरे (९३२४३७२१६६), संजय पाटील (९८१९३८३२६३), दर्शन म्हात्रे (९९८७३३१९९३), सुजित भगत (९८२०७२७१९०), सतीश महाजन (९३२०४७६८१५) यांच्याशी संपर्क साधावा. रक्तदान शिबिराचे गुगल लोकेशन https://g.co/kgs/vPHcoM हे आहे.

या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी रक्तदान करून या महायज्ञात आपली सुद्धा एक समिधा अर्पावी, असे आवाहन अध्यक्ष सुखदेव तेजे व सेक्रेटरी विजय वनागे यांनी केले आहे.

# कर्मवीर जयंतीनिमित्त गव्हाण, जासईत अभिवादन



**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी, गोरगरिबांचे कैवारी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व संस्थेचे जनरल बॉडी आणि समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते तिर्थरूप कर्मवीर अण्णा व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या वेळी शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, उपसरपंच विजय घरत, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, उपप्राचार्य जगन्नाथ जाधव, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, रयत शिक्षण संस्थेचे लाइफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी, लाइफवर्कर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे तसेच सर्व रयत सेवक उपस्थित होते.




**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी, गोरगरिबांचे कैवारी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३४वा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी कर्मवीर अण्णांच्या पुतळ्याचे व प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयाच्या प्रांगणातील महापुरुषांच्या पुतळ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. कर्मवीर जयंतीनिमित्ताने कर्मवीर अण्णांच्या पालखी सोहळ्याचे आयोजन केले होते. पुष्पमाला व फुलांनी सजलेल्या आणि त्यात कर्मवीर अण्णांची प्रतिमा विराजमान असलेल्या पालखीची मिरवणूक विद्यालयाच्या प्रांगणात घोषणांच्या आतिषबाजीत स्कूल कमिटी, शिक्षक व ग्रामस्थांनी काढली.

कार्यक्रमात विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका टी. टी. घरत यांनी विद्यालयास अहुजा कंपनीची एमप्ली फायर मशीन भेट दिली. या सोहळ्यास कामगार नेते व भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, चेअरमन अरुण जगे, माजी सभापती नरेश घरत, व्हॉईस चेअरमन सखाराम घरत, शिक्षणप्रेमी यशवंत घरत, मधुकर पाटील, अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर, धर्मदास घरत, गणेश पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

हा जयंती सोहळा कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाइफवर्कर अरुण घाग, उपमुख्याध्यापक पी. पी. मोरे, पर्यवेक्षक आर. एस. साळुंखे आणि सर्व रयत सेवकांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रयत सेवक संघाचे उपाध्यक्ष नूरा शेख यांनी केले.



# चिरनेरमध्ये कुंभार कामाचे प्रशिक्षण

**चिरनेर : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथे नुकतेच केंद्र सरकारच्या हस्तशिल्प विभागाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या वतीने कुंभार काम प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.

या शिबिरात ३० प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतला आहे. हे प्रशिक्षण शिबिर एक महिना चालणार असून सहभागी झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थींना स्टायपेंड तसेच प्रमाणपत्र मिळणार आहे. या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कुंभार समाज महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस मोहन कुंभार, रायगड जिल्हाध्यक्ष अनंत महाडकर, ठाणे जिल्हा अध्यक्ष रामचंद्र पान्हेरकर, पनवेल तालुका अध्यक्ष राजेंद्र मांगरूळकर, कल्याण तालुका अध्यक्ष स्वप्निल केंबुळकर, महिला आघाडी कोकण विभाग अध्यक्ष मिना चौलकर, महिला आघाडी पनवेल अध्यक्ष विमल वाजेकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संत गोरोबाकाका सेवा मंडळाचे अध्यक्ष गजानन चौलकर यांनी केले. सूत्रसंचालन रमाकांत गोरे व संतोष चौलकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार किरण कुंभार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुंभार समाजाचे उरण तालुका अध्यक्ष विष्णू चौलकर, चिरनेर ग्रामपंचायत सदस्य तथा युवक आघाडी कोकण विभाग कार्याध्यक्ष किरण कुंभार, दीपक गोरे यांनी विशेष प्रयत्न केले.


## संपादकीय

# उद्दाम साहेबीपणा

भारत, दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांमधून येणाऱ्या प्रवाशांना चौदा दिवस विलगीकरण आणि दोनदा आरटीपीसीआर चाचणी ब्रिटिश सरकारने सक्तीची केली आहे. इंग्लंडला पोचणारा प्रवासी भारतीय नागरिक कोव्हिशिल्ड लसीचे दोन्ही डोस पूर्ण करून तेथे पोहोचला असला तरी त्यालाही विलगीकरणात जावे लागणार आहे. वास्तविक ॲस्ट्रा झेनेका या ब्रिटिश कंपनीच्या लसीचे भारतीय नाव म्हणजे कोव्हिशिल्ड. तरीही ब्रिटिश सरकारने कोव्हिशिल्ड लस घेतलेल्या भारतीय प्रवाशांना विलगीकरणाची अट घातली हे आश्चर्यकारक आहे.

**ज्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नाही असे म्हटले जात होते, त्या ब्रिटिश साम्राज्याचा अस्त केव्हाच झाला आहे. व्यापाराच्या मिषाने जगभरात विविध देशांमध्ये हातपाय पसरणाऱ्या आणि स्थानिक जनतेचे यथेच्छ शोषण करून स्वतःची तुंबडी भरणाऱ्या ब्रिटिश साहेबाला १९४७ साली एका पंचाधारी महात्म्याने भारतातून बाहेरचा रस्ता दाखवला. दुसऱ्या महायुद्धात पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांच्या समर्थ नेतृत्वाखाली अमेरिकेच्या मदतीने ब्रिटिश फौजांनी विजय संपादन केला खरा, परंतु त्यानंतर या साम्राज्याला तडे जाऊ लागले. अनेक देशांमधून ब्रिटिशांना काढता पाय घ्यावा लागला. सर विन्स्टन चर्चिल यांचे अमोघ वक्तृत्व, आंग्ल भाषेवरील प्रभुत्व आणि आक्रमक नेतृत्वाबद्दल भारतात देखील यथोचित गुणगान केले जाते. परंतु चर्चिल साहेबांचा भारतद्वेष तितकाच उबग आणणारा होता हे देखील लक्षात ठेवायला हवे. निदान भारतीयांनी तरी गोऱ्या साहेबास नेटिवांबद्दल वाटणारा दुस्वास विसरता कामा नये. या कडवट इतिहासाची जाणीव पुन्हा एकदा होण्याचे कारण म्हणजे सध्या ब्रिटनने कोरोना प्रतिबंधक लसींसंदर्भात स्वीकारलेले वर्णद्वेषी धोरण हे होय. कोव्हॅक्सिन या संपूर्णतः भारतीय बनावटीच्या कोरोना प्रतिबंधक लसीला जागतिक आरोग्य संघटनेनेही अद्याप मान्यता दिलेली नाही. ही मान्यता जून महिन्यात मिळणार होती असे सांगण्यात येते. परंतु ती आता ऑक्टोबरच्या अखेरीपर्यंत मिळेल असा अंदाज आहे. कोव्हिशिल्ड ही भारताची दुसरी लस मात्र जगभरात मान्यता प्राप्त आहे. भारत सरकारने तीव्र नाराजी व्यक्त केल्यानंतर ब्रिटिश सरकारने यासंदर्भातील आपल्या काही अटी थोड्या शिथिल केल्या. विलगीकरण चौदा दिवसांवरून दहा दिवसांवर आणले आणि कोव्हिशिल्ड लस ब्रिटिश भूमीत घेता येईल असे स्पष्ट केले. परंतु भारतीय प्रवाशांना मात्र मज्जाव कायम ठेवला. याचाच अर्थ असा की ब्रिटिश सरकारला कोव्हिशिल्ड ही भारतीय लस चालणार आहे, पण तीच लस घेतलेले भारतीय प्रवासी मात्र नको आहेत. हा उघड उघड वर्णविद्वेषाचाच प्रकार आहे हे कोणालाही कळेल. ब्रिटनमध्ये असंख्य भारतीय वंशाचे लोक राहतात. इतकेच नव्हे तर अनेक भारतीय वंशाचे ब्रिटिश नागरिक तेथे प्रतिष्ठित पदांवर कर्तव्य बजावत आहेत. काही भारतीय तर ब्रिटिश सरकारमध्ये मंत्रीपदापर्यंत पोहोचले आहेत. तरीसुद्धा भारतीयांबद्दल असा वर्णभेद करण्याचे प्रकार घडतात हे उद्वेगजनक आहे. आपले राज्य विलयास जाऊन कैक दशके लोटली आहेत याचे भान ब्रिटिश सरकारला कुणीतरी करून द्यायला हवे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समर्थ नेतृत्वाखाली भारत देश विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करत आहे. लवकरच आपला देश जगातील एक महासत्ता म्हणून उभा राहील असे भाकित जगातील अनेक अर्थपंडित करतात. आपण कुठल्या जमान्यात राहतो आहोत याचा विचार ब्रिटिश साहेबाने आता करायला हवा.**

# महाराष्ट्रात ई-पीक नोंदणी सोयीची



सातबारा उतारा म्हणजे जमिनीचा एक प्रकारचा आरसा होय. कारण हा उतारा वाचून प्रत्यक्ष जमिनीवर न जाता त्या जमिनीचा संपूर्ण अंदाज आपल्याला बसल्या जागी मिळू शकतो. पूर्वी सातबारा काढण्यासाठी तलाठी कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत होत्या. एकाच तलाठ्याकडे चार ते पाच गावे असल्याने तो तलाठी कधी येईल आणि आपला सातबारा कधी मिळेल याची आतुरता प्रत्येक शेतकऱ्याला असायची. सातबाऱ्यावरील विविध नोंदींमुळे शासनाच्या योजना, दाखले मिळविण्यासाठी सातबारा हा महत्त्वाचा ठरतो.

शासनाच्या महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९७१ अंतर्गत शेतजमिनींच्या हक्कांबाबत विविध नोंदी ठेवल्या जातात. यासाठी वेगवेगळी नोंदणीपुस्तिके (रजिस्टर बुक्स) आहेत. या नोंदवह्यांमध्ये कुळांचे मालकी हक्क, शेतजमिनीचे हक्क, त्यातल्या पिकांचे हक्क यांचा समावेश असतो. तसेच यासोबत २१ वेगवेगळ्या प्रकारचे 'गावचे नमुने' ठेवलेले असतात. यापैकी 'गावचा नमुना' नं ७ आणि 'गावचा नमुना' नं १२ मिळून सातबारा उतारा तयार होतो. म्हणून त्या उताऱ्याला सातबारा उतारा असे म्हणतात. गाव नमुना नंबर सात व गाव नमुना नंबर बारा हे एकत्र करून त्यातील माहिती साताबाऱ्याच्या रूपात दिली जाते. त्यात बरोबरीने सातबारा उताऱ्यात गावाचा नमुना नंबर ६ अ मधील माहितीसुद्धा समाविष्ट केलेली असते. प्रत्येक जमीनधारकास स्वतःकडे असलेली जमीन किती व कोणती हे सातबारा उताऱ्यावरून कळू शकते. 'गाव नमुना ७' हे अधिकारपत्रक आहे व 'गाव नमुना १२' हे पीक-पाहणी पत्रक आहे. जमीन व महसूलीच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक गावातील तलाठ्याकडे हे 'गाव नमुने' असतात. या नमुन्यांमध्ये भरलेल्या अद्ययावत माहितीमुळे शेतकऱ्याचे उत्पादन, शेत जमिनीची प्रतवारी तसेच दुष्काळ, अतिवृष्टी किंवा वादळामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज लावणे शक्य होते.

शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यासाठी पीक पाहणीची नोंद अत्यंत महत्त्वाची आहे, मात्र दोन तीन गावांमध्ये मिळून एकच तलाठी असल्याने पीक पाहणी अचूक नोंदवली जात नाही. अशा शेतकऱ्यांना नेहमीच अडचणी येत होत्या. पीक पाहणीच्या चुकीच्या किंवा वेळेत न झालेल्या नोंदीमुळे या शेतकऱ्यांना शासनामार्फत देण्यात येणाऱ्या पीक कर्ज किंवा कर्जमाफीचा लाभ घेता येत नव्हता. ही बाब लक्षात घेता आता महसूल विभागाने आपल्या पिकाची रिअल टाइम नोंदणी करण्याची सुविधा थेट शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. महसूल विभागाने यासाठी स्वतंत्र मोबाईल ॲप्लिकेशनची निर्मिती करण्यात आली असल्याची माहिती महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी एका कार्यक्रमात दिली. या ई-पीक पाहणी प्रकल्पाची सुरुवात १५ ऑगस्टपासून राज्यभर करण्यात आली आहे. टाटा ट्रस्टच्या सहाय्याने या ॲपची निर्मिती करण्यात आली असून पीकपेरणी अहवालाची वस्तुनिष्ठ माहिती संकलित होण्याच्यादृष्टीने आणि पीकविमा व पीकपाहणी दावे निकाली काढण्यासाठी या ॲपचा चांगला उपयोग होणार आहे. या मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये शेतकरी पिकांची माहिती भरतील, तलाठी या पिकांच्या नोंदी तपासून घेतील. यामुळे पीक पेरणीची रियल टाइम माहिती ॲप्लिकेशनमध्ये संकलित होणार आहे. तसेच ही माहिती संकलित होताना पारदर्शकता येणार आहे. या प्रणालीत शेतकऱ्यांचा थेट सहभाग असल्याने पारदर्शकता आणणे शक्य झाले आहे. पीक पाहणी नोंदणीमध्ये शेतकऱ्यांचा सहभाग वाढवल्यामुळे पीकविमा आणि पीकपाहणीचे दावे निकाली काढण्याची प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यातही यामुळे सुलभता येईल. तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि मदत देणेही शक्य होईल, ई-पीक पाहणी मुळे राज्यातील पिकांचे अचूक क्षेत्र कळणार आहे. त्यामुळे राज्यातील आर्थिक पाहणी आणि कृषी नियोजन करणे शक्य होणार आहे.

शेतकऱ्यांनी स्वतः त्यांच्या शेतात पेरलेल्या पिकांची ई-पीक पाहणी मोबाईल ॲपचा वापर करून नोंद करायची आहे. ही नोंद न केल्यास शेतकऱ्यांचा सातबारा या रकान्यामध्ये असलेला पिकांचा रकाना कोरा राहणार आहे. ई पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंद न केल्यास पुढील प्रमाणे नुकसान होईल.

शेतकऱ्यांचे शेत पडीक दाखविले जाईल किंवा पेरणी झालीच नाही असे दाखविले जाईल. पिक कर्ज मिळण्यास अडचणी निर्माण होतील. प्रधानमंत्री पिक विमा योजनेपासून शेतकरी वंचित राहील. एखाद्या ठराविक पिकास शासनातर्फे मदत जाहीर झाली तर त्याचा लाभ मिळणार नाही. रानटी जनावरांनी शेतातील पिकांचे नुकसान केले तर त्याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी या ई पीक पाहणी प्रकल्पाचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

ई-पीक नोंदणी प्रकल्प यापूर्वी प्रायोगिक तत्वावर वीस तालुक्यांमध्ये राबवण्यात आला होता. त्याला मिळालेल्या यशानंतर हा प्रकल्प राज्यभर राबविण्याचा निर्णय महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी घेतला. त्यासंदर्भात राज्य शासनाने शासन आदेश जारी केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय या https://www.maharashtra.gov.in/Site/Upload/Government%20Resolutions/Marathi/२०२१०७३०१६११०५८८१९.pdf संकेतस्थळावर हा आदेश उपलब्ध आहे. शिवाय ई-पीक पाहणी प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्य, विभागीय, जिल्हा आणि तालुकास्तरिय सनियंत्रण समित्या गठित करण्यात आल्या आहेत. याशिवाय पूर्ण वेळ प्रकल्प अंमलबजावणी कक्ष हा संचालक भूमी अभिलेख, पुणे यांच्या नियंत्रणाखाली सुरू करण्यात आला आहे.

सर्व प्रथम ॲन्ड्रॉइड मोबाईलमधील प्ले स्टोअरमधून ई पीक पाहणी हे ॲप्लीकेशन डाऊनलोड करून घ्यावे. https://play.google.com/store/apps/details?id=org.mahait.epeek त्यानंतर शेतकऱ्याने स्वतःचा मोबाईल क्रमांक नोंदवावा. पुढे स्वतःचा जिल्हा, तालुका, गाव निवडा आणि खातेदार निवडा किंवा गट क्रमांक टाका. ही माहिती भरुन झाल्यानंतर आपला परिचय निवडा आणि त्यानंतर पुन्हा होम पेजवर या. होम पेजवर आल्यानंतर पीकाची माहिती भरा, पीकाची अचूक माहिती भरल्यानंतर खाते क्रमांक निवडा, पुढे भूमापन क्रमांक किंवा गट क्रमांक निवडल्यानंतर जमिनीचे एकूण क्षेत्र निवडा, पुढे हंगाम निवडा, त्यानंतर पीकाचा वर्ग निवडा, एक पीक असेल तर निर्भेळ पीक (एक पीक) निवडा, किंवा एका पेक्षा जास्त पीक असेल तर बहुपिक निवडा, हे झाल्यानंतर पिकाचे नाव निवडा, सिंचन पद्धत, लागवडीचा दिनांक या सर्व गोष्टी अचूकपणे भरल्यानंतर शेतकऱ्याने स्वतःच्या मोबाईलचे जीपीएस, स्थान (लोकेशन) चालू ठेवून शेतात उभे राहून मुख्य पिकाचे छायाचित्र काढावे ही महत्त्वाची प्रक्रिया असल्याने मुख्य पिकाचे छायाचित्र काढाताना शेतकऱ्याने विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. हे सर्व झाल्यानंतर माहिती समाविष्ट करावी. ई पीक पाहणी इतक्या सोप्या पध्दतीने करता येते.

ई-पीक पाहणी अंतर्गत खातेदाराची एकदाच नोंदणी करता येईल. १५ सप्टेंबरपर्यंत हंगाम निहाय पिकाची माहिती अक्षांश-रेखांशासह काढलेल्या पिकाच्या छायाचित्रासह अपलोड करण्यात येईल. १६ ते ३० सप्टेंबर दरम्यान मोबाईल पमधील माहितीची अचूकता पडताळून आणि आवश्यक असल्यास दुरूस्ती करून तलाठ्याव्दारे कायम केली जाईल. खातेनिहाय पिकांची माहिती संबंधित डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ मधील गाव नमुना १२ मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. १ ऑक्टोबरपासून शेतकरी रब्बी हंगामाची पीक पाहणी अपलोड करू शकतात. एका मोबाईलवरून २० खातेदारांची नोंदणी करता येणार असल्याने एखाद्या शेतकऱ्याकडे स्वतःचा स्मार्टफोन नसल्यास उपलब्ध होणारा दुसरा स्मार्टफोन वापरता येईल. अल्पवयीन खातेदाराच्या बाबतीत त्याचे पालक नोंदणी करू शकतात. सामायिक खातेदार त्यांच्या वहीवाटीत असलेल्या क्षेत्रातील पिकांची स्वतंत्रपणे नोंदणी करू शकतील. ई पीक पाहणीचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा यासाठी प्रशासनामार्फत आवश्यक प्रशिक्षणाला सुरूवात करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी या प्रणालीची माहिती घेतल्यास येत्या काळात त्यांना ई-पीक पाहणी उपयुक्त ठरू शकेल असा प्रशासनाला विश्वास आहे. शेतकऱ्यांना विविध सुविधा आणि योजनांचा लाभ घेणे शक्य होणार असल्याने आणि ही प्रक्रिया पारदर्शक असल्याने प्रत्येक शेतकऱ्याला यात सहभागी करून घेण्याचे प्रशासनाचे प्रयत्न आहेत.

**-प्रवीण डोंगरदिवे,** माहिती सहाय्यक, कोकण विभाग, नवी मुंबई

# तेल तवंगाने रेवदंडा समुद्रकिनारा विद्रूप

## कांदळवनास धोका; तांडेल फाउंडेशनची प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार

(छाया : महेंद्र खैरे)



मोठी जहाजे खराब ऑईल समुद्रात टाकत असतात. समुद्रातून वाहून आलेल्या तेल तवंगाने रेवदंडा समुद्रकिनारा विद्रूप झाला असून त्यामुळे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

तेल तवंग पसरल्याने रेवदंडा समुद्रकिनारा विद्रूप होत असून, पर्यटकही नाराज झाले आहेत. समुद्रातून वाहून आलेला तेल तवंग किनाऱ्यावरील कांदळवनास हानिकारक असून, कांदळवन नष्ट होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. त्याबाबत पै. अब्बासभाई तांडेल फाऊंडेशनच्या अध्यक्षा नईमा सलीम तांडेल यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास निवेदन पाठविले आहे.

येथे येणारे पर्यटक नापसंती व्यक्त करत आहेत. परिणामी सध्या येथे पर्यटकांची संख्या फार कमी झाली असून, त्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर व्यवसाय करणाऱ्या स्थानिकांना फटका बसत आहे. तेल तवंग कांदळवनास हानिकारक असून येथील कांदळवन नष्ट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या तेलतवंगाबाबत तातडीने योग्य कार्यवाही करावी, अशी मागणी तांडेल फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा नईमा तांडेल यांनी निवेदनात केली आहे.

# खोपोलीतील कृत्रिम तलावात २६८ गणपतींचे विसर्जन

**खोपोली : प्रतिनिधी**

येथील रोटरी क्लब, इनरव्हील क्लब, रोटरॅक्ट क्लब आणि खोपोली नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या कृत्रिम तलावात शहरातील २६८ गणपतींचे विसर्जन करण्यात आले.



गणपती बाप्पांचे विसर्जन करण्यासाठी खोपोली शहरातील नेहरू गार्डन, लक्ष्मी नगर गार्डन व शिळफाटा येथे कृत्रिम तलाव तयार करण्यात आले होते. शिवाय तीन टेम्पो नगर परिषदेच्या विविध विभागात फिरवण्यात आले होते. रोटरी क्लब, इनरव्हील क्लब, रोटरॅक्ट क्लब आणि नगर परिषदेने उभारलेल्या या कृत्रिम तलावांत दीड दिवसांचे १०२, पाच दिवसांचे १२५ आणि १० दिवसांचे ४१ अशा एकूण २६८ गणेश मुर्त्यांचे विसर्जन करण्यात आले.

रोटरी क्लब प्रेसिडेंट सुरेश खेडकर, सेक्रेटरी सुरेंद्र जोशी, माजी अध्यक्ष संजय पाटील, इनरव्हील क्लब अध्यक्षा सुचिता जोशी, रोटरॅक्ट क्लब अध्यक्ष शिवम महाबारे, सचिव श्रुती विध्वंस, सहसचिव विनय पटेल, समाजसेवा संचालक मिहीर भुटाला यांच्यासह नगर परिषदेचे पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी या उपक्रमाला सहकार्य केले.

## पान १ वरून

### ही तर अपरिपक्वता -फडणवीस

या ठिकाणी मुख्यमंत्री कार्यालयाने अपरिपक्वता दाखवली. सात दिवस संशोधन करून, वेगवेगळ्या राज्यांची आकडेवारी घेऊन अशा प्रकारचे पत्र पाठवण्याऐवजी राज्यातील पोलिसांना कडक कारवाईचे आदेश दिले असते आणि शक्ती कायद्यावर लवकर निर्णय करण्याचा विचार झाला असता तर ते अधिक संवेदनशील दिसले असते.

ओबीसी आरक्षणाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याचे सांगत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सरकारने स्वाक्षरीसाठी पाठविलेला अध्यादेश रोखला असून सरकारकडून खुलासा मागविला आहे. यावर बोलताना फडणवीस म्हणाले, ओबीसी आरक्षणासंदर्भातील अध्यादेशाचा प्रस्ताव राज्य सरकारच्या कायदा आणि न्याय विभागासमोर गेला. त्या वेळी विभागाने असे सांगितले की, हा मुद्दा सुप्रीम कोर्टात प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या परवानगीशिवाय असा अध्यादेश काढता येणार नाही, मात्र राज्य सरकारने यावर कुठलीही माहिती न घेता, कारवाई न करता थेट अध्यादेश काढण्याकरिता फाईल राज्यपालांकडे पाठवली. यावर राज्यपालांनी राज्य सरकारच्या कायदा आणि न्याय विभागाने दिलेली सूचना अधोरेखित करीत खुलासा मागविला आहे. त्यामुळे राज्यपालांनी राज्याच्या हिताचा, ओबीसी समाजाच्या हिताचा निर्णय घेतला आहे. अन्यथा ओबीसी समाजाची फसवणूक होईल, मात्र ज्या प्रकारे सत्ताधारी यावर प्रतिक्रिया देत आहेत यावरून त्यांच्या मनात ओबीसी समाजाला फसवायचे आहे, असे दिसते

केवळ दाखवण्याकरिता अध्यादेश काढू नका. आवश्यकता असेल तर आम्हीदेखील तुमच्यासोबत राज्यपालांकडे येऊ, आम्ही त्यांना विनंती करू, पण फसवणूक करू नका. अध्यादेश टिकेल असा काढला पाहिजे, असेही फडणवीस यांनी नमूद केले.

# नेरळमधील आदिवासी वाड्यांत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

नवी मुंबईतील श्री साई ट्रस्टकडून नेरळ भागातील चार आदिवासीवाड्यांमधील कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील आनंदवाडी येथील प्राथमिक शाळेत शिक्षत असलेल्या १०९ आदिवासी विद्यार्थ्यांना श्री साई ट्रस्टतर्फे ट्रस्टच्या डॉ. निर्मला राव, जयश्री जेठवानी यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य आणि खाऊ यांचे वाटप देण्यात आले. त्यानंतर नेरळ परिसरातील आनंदवाडी, फणसवाडी, आंबेवाडी, ढाकीचामाळ येथील १६३ आदिवासी कुटुंबांना ट्रस्ट तर्फे धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. या वेळी डॉ. निर्मला राव यांनी उपस्थितांना ट्रस्टच्या कामाची माहिती दिली. नेरळ ग्रामपंचायत सदस्य मंगेश म्हसकर, ट्रस्टचे कार्यकर्ते दिलीप घुले तसेच शिक्षक प्रदीप सैंदाणे यांच्यासह स्थानिक आदिवासी कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.




# मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा निकाल जाहीर

राज्यस्तरीय मायबोली एकपात्री अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास १० हजार रुपये, द्वितीय सात हजार, तृतीय क्रमांकास तीन हजार रुपये व उत्तेजनार्थ एकूण दोन पारितोषिके, तर रायगड जिल्हास्तरीय अभिनय स्पर्धेतील प्रथम क्रमांकास पाच हजार, द्वितीय तीन हजार, तृतीय क्रमांकास दोन हजार रुपये व उत्तेजनार्थ एकूण दोन पारितोषिके असणार आहेत.

**राज्यस्तरीय प्राथमिक फेरी निकाल**

प्रथमेश दिग्रजकर (नागपूर), मृणालिनी वानखेडे (ऐरोली), अजिंक्य टेकले (अंधेरी), गुरुप्रसाद गंगा (मुंबई), ज्योती उरणकर (पनवेल), कोमल वंजारे (कांदिवली), महेंद्र गोंदणे (भंडारा), मानसी पवार (घाटकोपर), निकिता झेपले (विलेपार्ले), ऋतिका चाळके (दादर), आसावरी येवले (दादर), गायत्री नाईक (वसई), हनुमंत शिंदे (सातारा), परेश राजश्री (मुंबई), सावनी देशपांडे (सोलापूर), हर्षदा वाघ (पुणे), अतुल शिर्के (रत्नागिरी), साक्षी देशपांडे (ठाणे), सिद्धी पारकर (विलेपार्ले), सुमित सावंत (दिवा), तृप्ती माळढोणकर (ठाणे), उमेश कांबळे (वसई), युवराज ताम्हणकर (पुणे), अमोघ देवस्थी (डोंबिवली).

**रायगड जिल्हास्तरीय प्राथमिक फेरी निकाल**

स्नेहल नरवडे (खांदा कॉलनी), उमेश वाळके (उसर्ली, पनवेल), प्रतीकेश मोरे (पळस्पे), ऋतुजा भगत (पनवेल), शर्मिली केळकर (पनवेल), तेजश्री येरवळकर (नवीन पनवेल), अनिकेत गाडे (खांदा कॉलनी), जुई रानडे (पनवेल), कौस्तुभ सोमण (पनवेल), मुग्धा दातार (पनवेल), नील जाधव (सुकापूर), नितेश मानकामे (आदई), परीन मोरे (नवीन पनवेल), प्रीती मोरे (नवीन पनवेल), श्रीश म्हात्रे (उरण), श्वेता कुलकर्णी (नवीन पनवेल).

# पेणच्या तहसीलदारपदी स्वप्नाली डोईफोडे

**पेण : प्रतिनिधी**

डॉ. अरूणा जाधव यांच्या बदलीमुळे रिक्त झालेल्या पेण तहसीलदारपदी स्वप्नाली दिलीप डोईफोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला. या पूर्वी त्या मलकापूर तहसीलदार म्हणून कार्यरत होत्या.



अरुणा जाधव यांची मुंबईमध्ये बदली झाली असून कोरोना काळात चांगल्या प्रकारे परिस्थिती हाताळल्याबद्दल अनेक संस्थांकडून त्यांचा कोरोना योद्धा म्हणून सन्मानही करण्यात आला होता. तसेच पूरस्थिती, चक्रीवादळामध्ये नागरिकांना शासकीय मदत पोहोचवून चांगल्या प्रकारे परिस्थिती हाताळली होती.

# खोपोलीत पीएचडी संशोधन केंद्र

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केएमसी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागास पीएचडी संशोधन केंद्र (पीएचडी रिसर्च सेंटर) सुरू करण्याची मान्यता मुंबई विद्यापीठाने दिली आहे.

तत्कालीन राज्यमंत्री बी. एल. पाटील यांच्या प्रेरणेने व नगर परिषदेच्या सहकार्याने १९७९ साली केएमसी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. पदवी व पदव्युत्तर-पदवी शिक्षण देणाऱ्या या महाविद्यालयात आता संशोधनपर (पीएचडी) अभ्यासाची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यासाठी केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून (DST-FIST) मिळालेल्या ७२ लाख रुपयांच्या अनुदानातून केएमसी महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाने सुसज्ज व अद्ययावत अशी प्रयोगशाळा तयार केली आहे.

संशोधन केंद्राची मान्यता ही आनंदाची व गौरवास्पद गोष्ट असून, परिसरातील नव्या युवा संशोधकांना या सुविधेचा लाभ होईल, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम व कार्यवाह किशोर पाटील यांनी व्यक्त केला.

पीएचडी प्रवेशासाठीची प्रक्रिया केएमसी महाविद्यालयाने सुरू केली असून, पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ३० सप्टेंबरपूर्वी महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. महेश खानविलकर यांनी केले आहे.

# रायगड जिल्ह्यात परतीच्या पावसाचे धूमशान

## माथेरान, नेरळ परिसर जलमय

**कर्जत : बातमीदार**

गेले दोन दिवस कोसळत असलेल्या मुसळधार पावसामुळे कर्जत तालुक्यातील नदी, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. या पावसाने तालुक्यात कुठेही नुकसान नाही, मात्र नेरळ आणि माथेरान परिसर जलमय झाला.दरम्यान,नेरळ गावातील काही घरांमध्ये पावसाचे पाणी घरात घुसले असून या पावसाने अनेकांच्या घरातील किमती साहित्याचे नुकसान केले आहे.

वेधशाळेने दिलेल्या इशाऱ्यानुसार पाऊस पडत असून २० सप्टेंबरच्या रात्रीपासून सुरु झालेला मुसळधार पाऊस थांबण्याचे नाव घेताना दिसत नाही. त्यामुळे कर्जत तालुक्यातील सर्व नद्या दुथडी भरून वाहत आहेत. शेती पावसाने भरून वाहत असली तरी या पावसामुळे कोणाचे नुकसान झालेले नाही. या पावसाने भातपिके आणखी जोमाने उभारी घेतील अशी आशा शेतकरी वर्गाला आहे. मात्र माथेरानच्या डोंगरात पडणाऱ्या पावसाने पायथ्याशी असलेली दोन्ही धरणे भरून वाहत आहेत.



(छाया : संतोष पेरणे)



कर्जत तालुक्यातील पाली भूतीवली येथील लघुपाटबंधारे प्रकल्प पुन्हा एकदा ओव्हरफ्लो झाला आहे. तर खालापूर तालुक्यातील मोरबे धरणाचे दरवाजे यावर्षी दुसऱ्यांदा उघडण्याची वेळ आली आहे. माथेरानच्या डोंगरातील पावसाचे पाणी नेरळ भागातून उल्हास नदीला मिळते. ते पाणी नेरळ गावसाठी धोकादायक बनले आहे. पायरमाल भागातून येणाऱ्या नाल्याचे पाणी खांडा येथे कर्जत-कल्याण रस्त्यावरील पुलावरून तसेच रेल्वे स्टेशनजवळ असलेला लहान पुलावरून पावसाचे पाणी जात होते. या भागातील राही हॉटेल परिसर पुन्हा जलमय झाला होता. या पावसाचे पाणी तेथील अनेकांच्या घरात पाणी शिरले असून, औटी यांच्या घरात दीड फूट पाणी भरले होते.

माथेरानच्या डोंगरातील पाणी ज्या मातोश्री नगर भागातील नाल्यातून नेरळ एसटी स्टँड भागात येते, तेथील परिसर दोन दिवस कोसळत असलेल्या पावसामुळे जलमय झाला होता. मातोश्री नगरमधील डॉ. सागर काटे यांच्यासह १२ घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले आहे. मातोश्री नगरचा कळंब रोडला जोडणारा रस्तादेखील जलमय झाला असून, रॅपिड रेसिडेन्सीमध्ये पावसाचे पाणी शिरले होते. निर्माण नगरी भागात पुन्हा एकदा पाणी थांबून राहिले होते, तर नेरळ एसटी स्टँडमध्ये दीड फूट पाणी साचले होते.

बुधवारी संध्याकाळी पावसाचा जोर कमी झाला असून सखल भागात साचलेले पाणी ओसरले असल्याची माहिती नेरळ ग्रामपंचायत आणि महसूल विभागाकडून देण्यात आली.

(छाया : सलीम शेख)





## जनजीवन विस्कळीत

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यात गेले दोन दिवस मुसळधार पाऊस पडत असून, जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवामान खात्याने सलग चार दिवस जोरदार अतिवृष्टी होण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे विशेषत: नदीकाठच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माणगाव तालुक्यात सोमवार सकाळपासूनच सर्वत्र ढगाळ वातावरण होते. ही संततधार बुधवारीही सुरूच सुरु होती. पावसाच्या सरीवर सरी पडत राहिल्याने नागरिकांच्या कामांत व्यत्यय आला.

दरम्यान, हवामान खात्याने पुन्हा चार दिवस अतिवृष्टी होणार असल्याचा अंदाज वर्तवल्याने नदी व समुद्रकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत.

(छाया : विनायक माडपे)





# अतिवृष्टीमुळे खालापुरातील बळीराजा चिंताग्रस्त

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

गणपती विसर्जनानंतर पाऊस पुन्हा एकदा सक्रिय झाल्यामुळे अनेकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. परतीच्या पावसाने खालापूर तालुक्यात चांगलाच धुमाकूळ घातला आहे. जिकडे तिकडे पाणीचं पाणी पाहावयास मिळत आहे. मात्र भाताच्या लोंब्यांमध्ये दाणे तयार होत असतांना कोसळत असलेल्या पावसामुळे बळीराजा धास्तावला आहे.

गेल्या तीन दिवसापासून कोसळत असलेल्या या पावसामुळे ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था होवून वाहतूक कोंडीची समस्या डोके वर काढत आहे. खालापूर तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने शेती जलमय झाली आहे तर ओहळ आणि बंधारे दुथडी भरून वाहत आहेत. काही ठिकाणी असलेल्या जुन्या फरशी पूलावरून पाणी जात आहे. नोकरदारांची कामावर जाताना तारांबळ उडत आहे.

संततधार पावसामुळे पाताळगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. नवी मुंबईस पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाच्या पाणी पातळीत वाढ झाली असल्याने धरणाचे दरवाजे उघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तालुक्यातील पोलीस पाटील, सरपंच यांनी गावामध्ये सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

(छाया : अरुण नलावडे)



तालुक्यातील धावरी नदीकाठी जाऊ नये तसेच नदीकाठच्या फार्महाऊसवर थांबू नये व मासेमारीसाठी कोणी गेले असले तर त्यांना बोलावून घ्यावे, विशेषत: आसरे आणि जांभिवली परिसरातील ग्रामस्थांनी सतर्क राहवे, असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.

# रायगडात तापाची साथ

### ऑगस्ट महिन्यात आढळले डेंग्यूचा एक आणि हिवतापाचे १४ रुग्ण. मात्र सुदैवाने मृत्यू नाही

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सध्या तापाचे रुग्ण आढळून येत आहेत. हे रुग्ण हिवताप किंवा डेंग्यूचे असण्याची भीती व्यक्त केली जात आहे, मात्र मागील वर्षाच्या तुलनेत यंदा डेंग्यू व हिवतापाचे रुग्ण कमी आढळून आले आहेत. जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात हिवतापाचे १४ तर डेंग्यूचा अवघा एक रुग्ण आढळून आला आहे. जिल्ह्यात हिवताप किंवा डेंग्यूमुळे एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही.

रायगड जिल्ह्यात सध्या सर्दी, खोकला, ताप ही संसर्ग लक्षणे असलेले रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळू लागले आहेत. खाजगी रुग्णालयांसह शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी रुग्ण येत आहेत. यात कोरोना, मलेरिया किंवा डेंग्यूचे रुग्ण जास्त असण्याची भीती व्यक्त केली जात होती. प्रत्यक्षात मात्र रायगड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात हिवतापाचे १४ रुग्ण आढळून आले आहेत. डेंग्यूचा केवळ एक रुग्ण सापडला आहे. जे तापाचे रुग्ण आढळत आहेत, त्यातील बहुतांश रुग्णांना वातावरणातील बदालामुळे ताप आला असल्याचे सांगण्यात आले. ऑगस्ट महिन्यात डेंग्यूसदृश्य ३३ रुग्णांच्या रक्ताचे नमुने तपासण्यात आले. यामध्ये एकाला डेंग्यूची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले.

> **मलेरिया आणि डेंग्यूचे प्रमाण पनवेल तालुक्यात जास्त आहे. कुठेही साथ नाही. ज्या भागांमध्ये या तापाचे रुग्ण सापडले आहेत, तेथे फवारणी सुरू केली आहे.**
> **-डॉ. आर. के. भोसले, जिल्हा हिवताप अधिकारी, रायगड**

डेंग्यू व चिकुनगुन्या हे आजार एडिस इजिप्ता या डासांमुळे होतात. दोन ते सात दिवस तीव्र ताप येणे, डोकेदुखी, तीव्र सांधेदुखी व कंबरदुखी, अंगावर पुरळ येणे, मळमळ आणि उलट्या होणे ही या आजारांची लक्षणे आहेत.

या तापांची साथ आपल्या परिसरात पसरू नये म्हणून आपल्या घराचा परिसर, गाव स्वच्छ ठेवा, अळीनाशक फवारणी करा, पाण्याचे साठे आठवड्यातून किमान एकदा स्वच्छ करा, फुटक्या वस्तू, टायर यामध्ये पाणी साठणार नाही याची काळजी घ्या, त्याचबरोबर तापाची साथ आली असेल तर आरोग्य यंत्रणेशी संपर्क करावा असे आवाहन आरोग्य यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे.

## कर्जत एकसळमध्ये नागाला पकडण्यात यश

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील एकसळ गावातील एका घरात नाग या सापाने गेल्या दहा दिवसांपासून ठाण मांडले होते. सर्पमित्र ऋषी शिंदे याने अडीच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर या नागाला पकडून डोंगराळ भागात सुरक्षित सोडून दिले.

कर्जत तालुक्यातील एकसळ गावातील प्रदिप बोराडे हे कुटुंबासह नव्याने बांधलेल्या घरात राहतात. त्यांच्या पत्नी कविता हिला दहा दिवसांपुर्वी घरातीच्या वरच्या बाजूला एक मोठा साप दिसला.


साप भिंतीच्या अडचणीच्या ठिकाणी होता. तो बाहेर येत नसल्याने घरातील सर्वजण भियभीत झाले होते.

सर्पमित्र ऋषीकेश शिंदे यास पाचारण करण्यात आले. ऋषीकेशने भिंत फोडून या सापाला पकडले. हा साप अस्सल विषारी नाग असल्याचे निदर्शनास आले. त्याची लांबी सुमारे पाच फुट होती.

# विवाहितेवर बलात्कारप्रकरणी चुलत सासऱ्याला सक्तमजुरी

### ■ माणगाव सत्र न्यायालयाचा निकाल

(छाया : शैलेश पालकर)





**पोलादपूर : प्रतिनिधी**

धनगर कुटूंबातील अल्पवयीन विवाहितेवर तिच्याच चुलत सासऱ्याने तिचे अपहरण करून वरंध घाटातील एका टपरीमध्ये तसेच एका मंदिराच्या पडवीमध्ये तीनवेळा बलात्कार केल्याचा गुन्हा १३ जानेवारी २०१८ रोजी घडला होता. याप्रकरणी माणगाव सत्र न्यायालयाने मंगळवारी (दि. २१) आरोपी चुलत सासऱ्याला १० वर्षे सक्तमजुरी आणि एक लाख ५०हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

पुरंदर (जि. पुणे) येथील एक धनगर कुटूंब मेंढरं घेऊन दरवर्षीप्रमाणे पोलादपूर तालुक्यातील धारवली गावामध्ये आले होते. त्यातील एका अल्पवयीन विवाहितेला तिच्या चुलत सासऱ्याने १३ जानेवारी २०१८ रोजी महाड तालुक्यातील वरंध घाटातील टपरीमध्ये नेऊन बळजबरीने शरीरसंबंध ठेवले आणि नंतरही वाघजाई मंदिराच्या पडवीमध्ये दोनवेळा जबरदस्तीने चुलत सासऱ्याने शरीरसंबंध ठेवले.

या प्रकरणी पोलादपूर पोलिसांनी पीडितेचा चुलत सासरा असलेल्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला. सहाय्यक निरीक्षक प्रकाश पवार यांनी तपास करून आरोपीविरूध्द माणगाव येथील विशेष न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

विशेष व सत्र न्यायाधीश पी. पी. बनकर यांनी मंगळवारी आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी आणि एक लाख ५०हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

# अतुल झेंडे रायगडचे नवीन अप्पर पोलीस अधीक्षक

**अलिबाग : प्रतिनिधी**

सचिन गुंजाळ यांच्या प्रशासकीय बदलीमुळे रिक्त झालेल्या रायगडच्या अप्पर पोलीस अधीक्षक पदावर अतुल झेंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी मंगळवारी (दि. २१) पदाची सूत्रे स्वीकारली.

अतुल झेंडे यापूर्वी सोलापूर ग्रामीण येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून येथे कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांनी नाशिक आणि रायगड जिल्ह्यात माणगाव येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम केले होते.



अतुल झेंडे यांनी सचिन गुंजाळ यांच्याकडून अप्पर पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारला. पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी त्यांचे स्वागत केले. सचिन गुंजाळ यांची ठाणे शहर पोलीस उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.

## कर्जतच्या नानामास्तर नगरमध्ये लसीकरण

**कर्जत :** नगर परिषद हद्दीतील नानामास्तर नगरमध्ये आयोजित केलेल्या शिबिरात ३७७ जणांचे लसीकरण करण्यात आले.

नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. विजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली परिचारिका संगीता खराटे, आरोग्यसेवक सुनील कांबळे यांनी या शिबिरात लस देण्याचे काम केले. या वेळी २६७ जणांना पहिला तर ११० जणांना दुसरा डोस देण्यात आला.

# बलात्काराची फिर्याद देणारी महिलाच निघाली आरोपी

### खालापूर पोलिसांनी केली चार जणांना अटक; महिला फरार

**खालापूर : प्रतिनिधी**

आपल्यावर बलात्कार झाल्याची फिर्याद देणारी महिलाच आरोपी असल्याचे खालापूर पोलिसांनी केलेल्या तपासात उघडकीस आले आहे.

या प्रकरणातील चार जणांना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी दिली आहे.

आपल्याला कामाची व पैशाची आवश्यकता होती. याचा फायदा घेवून दोघाजणांनी मला त्यांच्या दुकानात काम देतो असे सांगून दुकान पाहण्यासाठी खालापुर येथे बोलावून घेतले. तेथे त्यांनी आपल्याला कारमध्ये बसवून खालापूर ते चौक दरम्यान बंदुकीचा धाक दाखवत बलात्कार केल्याची तक्रार पंचवटी (जि. नाशिक) येथील एका महिलेने खालापूर पोलीस ठाण्यात दाखल केली होती.

पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास सुरू झाला मात्र फिर्यादी महिलेने दिलेल्या माहितीमध्ये तफावत जाणवत असल्याने पोलिसांना संशय आला. अधिक तपासात फिर्यादी महिलाच आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.

उपविभागीय पोलीस अधिकारी संजय शुक्ला आणि पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर पोलिसांनी तीन ठिकाणी सापळा रचून या प्रकरणी दिलीप साहेबराव यादव (वय ४६, रा. मोरदरी, हवेली पुणे), सुमित प्रकाश सापते (वय ३०, रा. गौडदरा, पुणे), बंटी उर्फ श्रीकांत गोधळी (वय ४०, रा. कल्याण, ठाणे), वैभव वसंत गिरकर (वय ३४, रा. परेल, मुंबई) यांना ताब्यात घेतले. त्यांना खालापूर न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली. मात्र फिर्यादी महिला फरार आहे.


**अंबर अपार्टमेंट को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पनवेल, जि. रायगड**

रजि. नं. : आरजीडी/पीडब्ल्यूसी/एचएसजी/ (टिसी) ५३२/८९-९०
याकूब बेग शाळेजवळ, पाटकर वाडा, पनवेल, जिल्हा रायगड.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे सोसायटीचे तारीख १८.०९.२०२१ रोजी झालेल्या 'विशेष सर्वसाधारण सभे'मध्ये सोसायटीची इमारत पुर्नबांधणीकरीता देण्याचे निश्चित केले असून त्याप्रमाणे सोसायटीचे सर्व उपस्थित सभासदांनी एकमताने ठराव पारित केला आहे.

सबब आम्ही तमाम लोकांस कळवित आहोत की, आमचे सोसायटीच्या सध्याच्या दोन्ही इमारती पूर्णपणे पाडून टाकून त्याठिकाणी पनवेल महानगरपालिकेकडून आमचे भुखंडास उपलब्ध होणारा व असणारा संपूर्ण एफ.एस.आय. वापरुन नवीन आर.सी.सी. पद्धतीच्या इमारतींचे बांधकाम करण्याकरीता इच्छुक विकासकांनी आणि अगर बिल्डर-डेव्हलपर्स यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत सोसायटीच्या सदर इमारतीची पुर्नबांधणी करण्याकरीता आपापले प्रस्ताव (कोटेशन) सोसायटीच्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवावेत आणि अगर समक्ष आणून द्यावेत.

वरील म्हणण्यास बाध न येता आम्ही असे जाहीर करतो की, सोसायटीस आणि अगर सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना कोणतेही विशेष कारण न देता उपलब्ध प्रस्तावापैकी कोणताही प्रस्ताव (कोटेशन) मंजूर करण्याचा आणि अगर नामंजूर करण्याचा संपूर्ण अधिकार व हक्क असेल याची कृपया सर्व लोकांनी नोंद घ्यावी.

मुदतीनंतर आलेल्या प्रस्तावांचा (कोटेशन्स) कोणताही विचार केला जाणार नाही आणि अगर त्या आमचेवर बंधनकारक रहाणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी म्हणून ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

श्री. एम. आर. धाराणी – फ्लॅट नं. १०५, 'अे' विंग, अंबर अपार्टमेंट (९३२३१ २३९८५)
श्री. एच. एम. मुल्ला – फ्लॅट नं. १०१, 'बी' विंग, अंबर अपार्टमेंट (९३२३९ ०६४७०)
श्री. एस. ए. शेख – फ्लॅट नं. ०२, 'अे' विंग, अंबर अपार्टमेंट (९८६९० ८७३९९)

**पनवेल.**
**तारीख : २१.०९.२०२१.**

**सही/-**
**अध्यक्ष** **सेक्रेटरी**
**अंबर अपार्टमेंट को-ऑप. हौ.सो., लि. पनवेल**

# राजस्थानचा पंजाबवर रोमहर्षक विजय

**दुबई : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये मंगळवारी रात्री झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने पंजाब किंग्सचा दोन धावांनी पराभव करीत रोमहर्षक विजय मिळवला. पंजाबला शेवटच्या षटकात चार धावांची गरज होती, मात्र राजस्थानचा गोलंदाज कार्तिक त्यागीने एकच धाव देत आणि दोन विकेट्स घेत सामना आपल्या संघाच्या बाजूने फिरवला.

राजस्थान रॉयल्सविरोधातील सामन्यात खेळताना पंजाबने त्यांचा विस्फोटक फलंदाज ख्रिल गेलला विश्रांती दिली. पंजाबने एडन मार्कराम, निकोलस पूरन, आदिल रशीद, फॅबियन एलन या चार विदेशी खेळाडूंसोबत खेळण्याचा निर्णय घेतला होता.

नाणेफेक गमावलेल्या संजू सॅमसनच्या संघाने प्रथम फलंदाजी करीत एविन लुईस, यशस्वी जयस्वाल आणि महिपाल लोमरोर यांच्या योगदानाच्या जोरावर पंजाबला १८६ धावांचे आव्हान दिले. पंजाबकडून अर्शदीप सिंगने ३२ धावांत पाच बळी घेतले. प्रत्युत्तरात पंजाबचे सलामीवीर के. एल. राहुल आणि मयंक अग्रवाल यांनी १२० धावांची दमदार सलामी दिली. मयंकने अर्धशतकी खेळी केली. शेवटच्या षटकात घडलेल्या नाट्यमय घडामोडीनंतर पंजाबला २० षटकात १८२ धावाच करता आल्या. त्यागीला सामनावीर पुरस्कार मिळाला.



### शेवटच्या षटकात फिरला सामना

*पंजाबला शेवटच्या षटकात विजयासाठी चार धावांची गरज असताना कार्तिक त्यागीच्या गोलंदाजीवर राजस्थानचा पूरन वैयक्तिक ३२ धावांवर बाद झाला. त्यानंतर त्यागीने एक चेंडू निर्धाव टाकला. पुढच्या चेंडूवर त्याने दीपक हुडाला यष्टीपाठी झेलबाद केले. एका चेंडूत तीन धावांची गरज असताना त्यागीने फॅबियन एलनला धावच घेऊ दिली नाही आणि राजस्थानने आपला विजय साजरा केला. दुसऱ्या बाजूला असलेला मार्कराम २६ धावांवर नाबाद राहिला.*

# पनवेलचा कुस्तीपटू शंकर जाधवला सुवर्णपदक



## आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या कला शाखेतील द्वितीय वर्षात शिकत असलेल्या शंकर सखाराम जाधव या विद्यार्थ्याने नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या नॅशनल स्टुडंट ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली. यासोबतच दुबई येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघाचा प्रतिनिधी म्हणून शंकरची निवड झाली आहे.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार, चेअरमन डॉ. अनिल पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन रामशेठ ठाकूर, रायगड विभागीय चेअरमन बाळाराम पाटील, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, जे. एम. म्हात्रे, महेंद्र घरत, संस्थेचे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव डॉ. प्रतिभा गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ. नरेश मढवी, डॉ. अनिल रोकडे तसेच जिमखाना विभागाचे प्रमुख डॉ. प्रफुल्ल वशेणीकर यांनी शंकर जाधवचे अभिनंदन केले आणि त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आमदार महेश बालदी यांच्याकडून प्रो कबड्डीपटू मयूर कदमचे अभिनंदन

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील बोकडवीरा गावचा गणेश क्लबकडून कबड्डी खेळणारा खेळाडू मयूर कदम याची प्रो कबड्डी लीगसाठी बंगळुरू बुल्स संघात निवड झाली आहे. याबद्दल आमदार महेश बालदी यांनी मयूरचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजप उरण तालुका अध्यक्ष व नगरसेवक रवी भोईर, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष शेखर पाटील, भाजप तालुका सरचिटणीस सुनील पाटील यांच्यासह गणेश क्लबचे सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते.




(छाया : दिनेश पवार)

## आरोग्य प्रहर

# दातदुखीची समस्या दूर करण्यासाठी घरगुती उपाय

दातदुखी ही एक तशी सामान्य समस्या आहे. बऱ्याच वेळा थंड किंवा गरम गोष्टी खाण्यामुळे दात दुखतात. यामुळे हिरड्यांमध्ये वेदना आणि सूज येते. कधीकधी दातदुखी इतकी वाढते की खाणे-पिणे कठीण होते. ही दातदुखीची समस्या दूर करण्यासाठी आपण अनेकदा औषधे घेतो. पण प्रत्येक वेळा औषध घेणे योग्य नाही. दातदुखीची समस्या दूर करण्यासाठी आपण काही घरगुती उपाय केले पाहिजेत.



**मीठाचे पाणी** – घसा खवखवणे, खोकला आणि दातदुखी दूर करण्यासाठी मीठाचे पाणी अत्यंत फायदेशीर आहे. यासाठी तुम्हाला फक्त एक कप कोमट पाणी घ्यावे लागेल आणि त्यात थोडे मीठ मिसळावे लागेल. त्यानंतर या पाण्याने गुळण्या करा. हे तोंडाचे संक्रमण कमी करून वेदना कमी करण्यास मदत करते. जर हे करूनही वेदना कमी झाल्या नाहीतर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**लवंग** – दातदुखीवर लवंग हा एक जुना उपाय आहे. हे केवळ वेदना कमी करत नाही तर सूजदेखील कमी करते. वेदनेपासून आराम मिळविण्यासाठी आपण अनेक प्रकारे लवंग वापरू शकता. यासाठी आपण गरम चहामध्ये लवंग टाकून सेवन करु शकता. याशिवाय बाधित भागाला तुम्ही लवंग तेल लावू शकता.

**लसूण** – भारतीय पाककृतीतील हे सामान्य घटक दातदुखीवर नियंत्रण ठेवण्यास मदत करू शकतात. त्यात बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म आहेत जे बॅक्टेरिया नष्ट करू शकतात आणि वेदना कमी करणारे म्हणून कार्य करतात. आपण लसूण चहा बनवू शकता किंवा लसणाच्या ताज्या पाकळीचे सेवन करु शकता. आपण प्रभावित क्षेत्रावर लसूण पेस्टदेखील लावू शकता.

**बेकिंग सोडा** – बेकिंग सोड्यामध्ये अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल आणि अँटीसेप्टीक गुणधर्म असतात. कोमट पाण्यात बेकिंग सोडा टाकून गुळण्या करा. यामुळे दातातील वेदना कमी होतील. याशिवाय तुम्ही कापसामध्ये थोडासा बेकिंग सोडा टाकून वेदना होत असलेल्या दातावर ठेवू शकता.

# सुधागडातील प्रसाद भिलारेची फुटबॉल चॅम्पियन स्पर्धेत निवड

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील खेळाडू आपल्या क्रीडा कौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर झळकत असून कळंबोशी गावचा सुपुत्र प्रसाद देविदास भिलारे याची इंडोनेशिया नेपाळ आशियाई फुटबॉल चॅम्पियन स्पर्धेत १९ वयोगटात नुकतीच निवड करण्यात आली आहे.

सध्या प्रसाद हा मिठागर फुटबॉल क्लब मुंबई या संघाकडून खेळतो आहे. फुटबॉलबरोबरच कराटेमध्येदेखील प्रसादने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते त्याला गौरविण्यात आले आहे. त्याच्या या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.








## राम प्रहर दिवाळी अंकासाठी आवाहन

दरवर्षी दिवाळी अंकात नावीन्यपूर्ण विषय हाताळून वाचकांना वैचारिक फराळाची मेजवानी देणाऱ्या दै. राम प्रहरने यंदा समाजातील लक्षणीय बदलांवर 'स्थित्यंतर' हा दिवाळी अंक प्रसिद्ध करण्याचे योजिले आहे. या अंकात आरोग्य, शिक्षण, धर्मकार्य, गाव, शहर, समाज, बाजारपेठ, कोरोना काळ, डॉक्टरी, वकिली व पत्रकारिता पेशा यासह (राजकारण वगळता) इतर क्षेत्रातील बदलांचा समावेश असणार आहे. आपल्या निरीक्षणातून टिपलेल्या बदलांबाबत अभ्यासपूर्ण लेख अपेक्षित आहे. त्याचबरोबर नेहमीप्रमाणे कथा, कविता, चारोळ्या, व्यंगचित्र आदी साहित्यही असणार आहे. आपला मजकूर मंगळवार, ५ ऑक्टोबर २०२१पर्यंत ramprahar@gmail.com या मेलवर टाईप करून पाठवावा. साहित्य निवडण्याचे अधिकार संपादकीय मंडळाला असतील. अधिक माहितीसाठी ७७३८१०६००९ या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधावा.

**–मुख्य संपादक**

# खो-खोमध्ये महाराष्ट्राच्या मुलांची विजयी सलामी

**भुवनेश्वर : वृत्तसंस्था**

येथील बिजू पटनाईक इनडोअर स्टेडियमवर सुरू झालेल्या ४०व्या राष्ट्रीय अजिंक्यपद कुमार-मुली खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलांनी सलामीला नागालँडवर ३२-६ असा एक डाव राखून २६ गुणांनी सहज विजय मिळविला. नागालँड संघ न आल्यामुळे मुलींच्या संघाला पुढे चाल मिळाली.

महाराष्ट्राकडून सूरज जोहरे, विवेक ब्राह्मणे व भगतसिंग वसावे यांनी प्रत्येकी पाच गडी टिपले. भगतसिंग व सौरभ अहिरने उत्तम संरक्षण करून विजयाची पायाभरणी केली, तर रवी वसावे आणि आदित्य कुदळे यांनी संरक्षणासह अनुक्रमे दोन व चार गडी बाद करून अष्टपैलू खेळ केला.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com